महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर

**बार्टी, राष्ट्रीय सेवा योजना, हिंदी व राज्यशास्त्र आणि IQAC विभाग**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

# भारतीय संविधान दिन सप्ताह सांगता समारंभ

**गुरुवार, दिनांक- 04 डिसेंबर, 2025**

**कार्यक्रम पत्रिका**

स्वागत आणि प्रास्ताविक : **डॉ. प्रकाश आठवले**

प्रमुख अतिथी : **मा.अरुण पाटील**

( पोलिस उपअधीक्षक, इस्लामपूर पोलिस ठाणे )

**प्रमुख उपस्थिती** : **मा. गणेश सवाखंडे**

(जिल्हा प्रकल्प अधिकारी, बार्टी संस्था )

**मा.अंकुश चव्हाण**

(समता दूत तथा तालुका प्रमुख वाळवा )

**डॉ. पी.व्ही. गायकवाड**

(उपप्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर.)

**प्रा. संतोष पाटील**

(उपप्राचार्य, ज्यु. विभाग कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर.)

**प्रा. डॉ. एस.के. माने**

(समन्वयक, IQAC विभाग )

अध्यक्ष मनोगत : **प्रा.डॉ. नितीन शिंदे**

(प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर )

आभार : **प्रा. ज्योती कथलकर**

सूत्रसंचालन : प्रा. अश्विनी थोरात, प्रा. वंदना पाटील

**स्थळ : G-14** **वेळ : सकाळी 9.30 वाजता**

## भारतीय संविधान दिन सप्ताह सांगता समारंभ (अहवाल)

दि. 04 डिसेंबर, 2025

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर मध्ये संविधान दिन सप्ताहाच्या सांगता समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे सांगली जिल्हा प्रकल्प अधिकारी मा. गणेश सवाखंडे, वाळवा तालुका प्रमुख व समता दूत मा.अंकुश चव्हाण व अध्यक्ष कॉलेजचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे होते.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की जगात तीन घटना समितीचे महत्त्व अन्याय साधरण आहे. त्यामध्ये अमेरिकन घटना समिती, फ्रेंच घटना समिती व भारतीय घटना समिती या तिन्ही घटना समितीच्या मध्ये **भारतीय राज्यघटना समितीला विशेष महत्त्व आहे कारण जगातील कोणत्याच घटना समितीत कलमांची तरतूद करताना तत्वज्ञानात्मक चर्चा करण्यात आलेली नाही** मात्र भारतीय घटना समितीत प्रत्येक कलमावर साधक भादक अशी तत्त्वज्ञानात्मक चर्चा होऊन व मतदान करून बहुमताच्या आधारे प्रत्येक कलम स्वीकृत करण्यात आलेले आहे.

भारतीय राज्यघटना एक साधन नसून त्या माध्यमातून सामान्य माणसांच्या जीवनात परिवर्तन घडवून यावे ही घटनाकारांची अपेक्षा होती. अतिशय प्रदीर्घ अन उच्च प्रतीची सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या भारतीय समाजाला सामर्थशाली ऊर्जेची आणि विवेकाची गरज आहे असा घटनाकारांचा विश्वास होता. त्याकरता राज्यघटने आवश्यक त्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ संसदीय शासन प्रणाली, सार्वत्रिक व प्रौढ मताधिकार, मूलभूत अधिकार, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था इत्यादी, भारतीय राज्यघटना हे आदर्श व मानवी अशा तत्त्वावर आधारित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इशारा दिला होता की देशात काही चुकीचे घडले तर त्यात दोष राज्यघटनेचा नसेल तर तो राबवणाऱ्या माणसांचा असेल कारण राजघटना कितीही वाईट असली आणि ती राबवणारे चांगले असतील तर वाईट राज्यघटनाही चांगली साबित होऊ शकते आणि राज्यघटना कितीही चांगली असली आणि ती राबविणारे वाईट असतील तर चांगली राज्यघटना सुद्धा वाईट साबित होऊ शकते म्हणून राजघटना राबविणाऱ्यांची नियत चांगली असायला हवी.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.नितीन शिंदे म्हणाले विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची ओळख व्हावी, त्यातील मूलभूल अधिकार व कर्तव्य यांची जाणीव व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक न्यायाची भावना रुजवावी या उद्देशाने ‘घर घर संविधान’ हा उपक्रम शासनातर्फे राबविण्यात येत आहे. या अनुषगाने आपल्या महाविद्यालयात भारतीय संविधान दिन सप्ताह साजरा करण्यात आला.

यावेळी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.पी.व्ही.गायकवाड, प्राध्यापक संतोष खडसे, प्रा. संतोष नांगरे, प्रा. मनोज पाटील डॉ. जाविद शेख यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक डॉ. प्रकाश आठवले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका अश्विनी थोरात यांनी केले तर आभार एनएसएस विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा.ज्योती कथलकर यांनी मानले.




भारतीय संविधान उद्देशिकेचे महत्त्व सांगता मा. अंकुश चव्हाण




भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करताना सांगली जिल्हा प्रकल्प अधिकारी बार्टी पुणे मा.गणेश सवाखंडे




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कॉलेजचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे




आभार व्यक्त करताना एन एस एस कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्योती कथलकर